# १७. रानपाखरा

• ऐका. म्हणा. वाचा.

रानपाखरा, रोज सकाळी येसी माझ्या घरा,
गाणे गाउन मला उठविसी मित्र जिवाचा खरा.
शरीर निळसर, शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी,
सतेज डोळे चमचम करती जणु रत्ने गोजिरी.

पाय चिमुकले, पंख चिमुकले, देह तुझा सानुला,
अफाट आभाळातुन कैसे उडता येते तुला ?
रात्र संपता डोंगर चढुनी वर येतो भास्कर,
तूही त्याच्या संगे येसी गात गात सुस्वर.



तुझ्यासारखे जावे वाटे उडत मजेने वरी,
नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडी बसवुनि पंखांवरी ?
माय तुझी येईल, सूर्य ही येइल भेटायला,
मजाच होइल सख्या पाखरा, नेइ एकदा मला.

**– गोपीनाथ**



**शब्दार्थ :** **देह** – शरीर. **सानुला** – लहान. **भास्कर** – सूर्य. **संगे** – सोबत. **सुस्वर** – गोड आवाज. **बिऱ्हाड** – घर. **सखा** – मित्र.

## स्वाध्याय

**प्र. १. कवितेच्या ओळींत शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द लिहा.**

(अ) घरा (इ) सानुला

(आ) त्यावरी (ई) भास्कर

**प्र. २. खालील गोष्टींचे वर्णन करणारे कवितेतील शब्द लिहा.**

**उदा.**, शरीर - निळसर

(अ) डोळे (इ) पंख (उ) आभाळ

(आ) पाय (ई) देह (ऊ) गाणे

**प्र. ३. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलगी रोज सकाळी कोणाला घरी बोलावते?

(आ) रानपाखराचे डोळे कसे आहेत ?

(इ) रानपाखराचा चिमुकला देह बघून कवितेतल्या मुलीला कोणता प्रश्न पडला आहे ?

(ई) सूर्य डोंगर चढून वर कधी येतो ?

(उ) कवितेतल्या मुलीला रानपाखराबरोबर कोठे जायचे आहे ?

(ऊ) कवितेतल्या मुलीला भेटायला कोण येणार आहे ?

(ए) कवितेतल्या मुलीला मजा केव्हा येईल असे वाटते ?

**प्र. ४. कोणाला म्हटले आहे ते लिहा.**

(अ) जिवाचा मित्र (आ) गोजिरी रत्ने

**प्र. ५. कवितेतल्या मुलीला रानपाखरू गाणे गाऊन उठवते. खालील मुले कशी उठत असतील, याची कल्पना करून रिकाम्या जागा भरा.**

**उदा.**, रेश्माला तिची आई उठवते. ती 'रेश्मा, ऊठ लवकर,' अशा हाका मारून उठवते.

(अ) सतीशला मोबाईलच्या गजराने जाग येते. मोबाईल ............ असा आवाज करून उठवतो.

(आ) भिकूचे घर दाट जंगलात आहे. त्याला ............ च्या आवाजामुळे जाग येते.

(इ) रफीकच्या घरामागून रेल्वेची लाइन जाते. तो दररोज ..................च्या आवाजामुळे उठतो. रेल्वे ......................आवाज करत जाते.

(ई) रेवतीचे घर घाऊक भाजीबाजारासमोर आहे. बाजार पहाटेच सुरू होतो. रेवती दररोज .......... अशा आवाजांमुळे उठते.

(उ) जानकीचे घर एस. टी. स्टँडच्या अगदी मागे आहे. त्यामुळे ती दररोज ...................... च्या ............. अशा आवाजामुळे उठते.

(ऊ) जमिलाची आई चादरीच्या कारखान्यात काम करते. त्यांचे घर कारखान्याच्या आवारातच आहे. जमिला रोज ............. च्या आवाजामुळे उठते.

(ए) दिनेशचे बाबा नगरपालिकेच्या बागेचे रखवालदार आहेत. बागेच्या एका कोपऱ्यातच त्यांचे घर आहे. दिनेशला रोज ............. च्या ............. अशा आवाजामुळे जाग येते.

## आम्ही फलक वाचतो

- **वाचा.**

एका शाळेच्या दर्शनी फलकावरील मजकूर इथे दिलेला आहे. तो वाचा. तुमच्या शाळेतील अशा फलकांवर लिहिलेला मजकूर दररोज तुमच्या वहीत लिहा. घरी वाचून दाखवा. तो शिक्षकांना दाखवा.




### सामान्यज्ञान

**करवंद**

करवंद हे आपल्या राज्यात सगळीकडे आढळणारे एक काटेरी झुडूप आहे. उघडी माळराने आणि डोंगराळ भागांत वाढणाऱ्या या झुडपाला चवदार फळे येतात. फळांचा रंग, आकार किंवा चवीवरून करवंदाला कडू करवंद, लिंबू करवंद, लेंडी करवंद, पांढऱ्या करवंद, किरी करवंद अशी नावे दिली आहेत. करवंद पिकल्यावर काळी होतात; पण किरी करवंदे मात्र पिकून गोडसर झाली तरी रंगाने हिरवीच राहतात.

### सुविचार व वार्ताफलक

सुविचार - आधी करा. मग बोला.

वार्ता -


### सूचना फलक

दि. १०/११/२०२१

दि. १४/११/२०२१ रोजी आपल्या शाळेत ‘बालदिन’ साजरा होणार आहे. त्यानिमित्ताने ‘बालसभा’ आयोजित केली आहे. बालसभेत ज्यांना भाषण करायचे आहे, त्यांनी आपली नावे वर्गशिक्षकांकडे आजच द्यावी.

मुख्याध्यापक

### प्रदर्शन फलक



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी जमवलेली निवडक कात्रणे, गोष्टी, गाणी, काढलेली चित्रे, विनोद इत्यादी शाळेच्या प्रदर्शन फलकावर लावावे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. परिपाठात विद्यार्थ्यांकडून फलकांवरील मजकूर वाचून घ्यावा.